कोरडवाहु शेती अभियान कार्यक्रम सन २०१७-१८ मध्ये रू.११२८.१६८ लक्ष निधी वितरणास वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कोशाशे- ४२१८/प्र.क्र.१७/८अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ६ मार्च, २०१८

वाचा :-

(१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्रमांक कोशेअ: २०११/ प्र.क्र. ४३/११/ (भाग-४) २ अे दिनांक १२ मार्च, २०१४.

(२) शासन निर्णय , कृषि व पदुम विभाग क्रमांक क्रमांक कोशेअ: २०१ ४/ प्र.क्र. ८२/१४/२ अे दिनांक १६ मे, २०१४.

(३) शासन पुरक पत्रक , कृषि व पदुम वभाग क्रमांक : कोशेअ -२०१५ प्र.क्र. ५४/ १५/ २ अे, दिनांक २९ फेबुवारी , २०१६

(४) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक : कोशेअ-२०१६/ प्र.क्र. ५७ / १६ /२ अे , दिनांक ३० जुलै, २०१६.

(५) शासन निर्णय , कृषि व पदुम विभाग क्रमांक : कोशेअ- २०१७ / प्र.क्र. ७० /१७ / २ अे, दिनांक २३ ऑगस्ट , २०१७

(६) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/ अर्थ-३ दि.०६.०२.२०१८

(७) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआआ.२०१७/कोशेअ/निधी/प्र.क्र.४१/२२७दि.६.११.२०१७

(८) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआआ.२०१७/कोशेअ/निधी/प्र.क्र.४१/१६/रासक/ दिनांक १९.०१.२०१८

प्रस्तावना :-

राज्य शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (१) वरील शासन निर्णयान्वये कोरडवाहु शेती अभियान अंतर्गत विविध योजनांचा समन्वय करून (Convergence) सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या कालावधीसाठी रू. २०, ००० कोटीचा कार्यक्रम राबविण्यास तसेच त्यापैकी रू. २००० कोटी तरतूद कोरडवाहु शेती अभियान योजनेस स्वतंत्ररित्या उपलब्ध करून देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने कोरडवाहु शेती अभियान (Dryland Farming Mission) कार्यक्रम सन २०१४-१५ मध्ये ४०३ गावांमध्ये राबविण्यास उक्त संदर्भ क्र. (२) वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. उपरोक्त ४०३ गावांपैकी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात १५६ गावांमध्ये आणि सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात १४८ गावांमध्ये “कोरडवाहु शेती अभियान कार्यक्रमांतर्गत” कामे पूर्ण झाली आहेत .

अशा प्रकारे उपरोक्त ४०३ गावांपैकी वर नमूद केल्याप्रमाणे ३०४ गावांमध्ये कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ९९ गावांमध्ये कामे अपूर्ण आहेत. या अपूर्ण असलेल्या उर्वरित ९९ गावांमध्ये कोरडवाहु शेती अभियानांतर्गत कामे पूर्ण करण्यासाठी सदर योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राबविण्यास उक्त संदर्भ क्र. (५) वरील शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली होती . तसेच अर्थसंकल्पीय आर्थिक तरतूदीपैकी रू. २४७३.८० लक्ष इतका निधीही उपलब्ध करून देण्यात आला होता.संदर्भ क्र. (७) व (८) अन्वये आयुक्त (कृषी) यांनी अपुर्ण असलेल्या उर्वरित ९९ गावांमध्ये कोरडवाहू शेती अभियानांर्तगत कामे पुर्ण करण्यासाठी निधीची मागणी केली आहे.संदर्भ क्र.(६)च्या परिपत्रकास अनुसरुन सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

१. कोरडवाहु शेती अभियान कार्यक्रमांतर्गत निवड करण्यात आलेल्या एकूण गावांपैकी सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या उर्वरित ९९ गावांतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता असलेल्या एकूण अर्थसंकल्पिय तरतूदीपैकी उर्वरीत रू. ११२८.१६८ लक्ष (रुपये अकरा कोटी अठ्ठाविस लक्ष सोळा हजार आठशे फक्त) निधी सदर शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात येत आहे.

२. सदरचा वितरीत निधी उपरोक्त ९९ गावांपैकी अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता, कमीत कमी निधीची आवश्यकता असलेल्या गावांसाठी प्रथम प्राधान्याने वापरण्यात यावा. तसेच सदर अभियान राबविताना संदर्भ क्रमांक (३) वरील शासन निर्णयान्वये कळविण्यात आलेल्या अटी शर्ती पैकी अट क्र. २ व ३ चे पालन कटाक्षाने करण्याची आयुक्त(कृषि) यांनी खबरदारी घ्यावी.

३. उपरोक्त प्रयोजनार्थ होणारा खर्च हा सन २०१७-१८ आर्थिक वर्षासाठी खालील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित केलेल्या निधीतुन खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.डी-३,
२४०१-पीक संवर्धन.-
१०९-विस्तार व शेतकरी प्रशिक्षण -
(०१) माहिती व प्रचार - राज्य योजनांतर्गत योजना
(०१)(५०) ,राज्यातील कोरडवाहु शेतीच्या स्थैर्यासाठी तरतूद करणे
(२४०१ ९२५१), (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य

४. सदर निधीचे जिल्हानिहाय वितरण करण्यास तसेच खर्चावर नियंत्रण ठेवण्यास, संचालक (विस्तार व प्रशिक्षण) , कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांना राज्य नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. या शासननिर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या रु.११२८.१६८ लाख रकमेचे कोषागारातुन आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत असुन, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य,पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे.

५. सदर अभियान राबविण्याकरीता येणारा प्रशासकीय खर्च व संकीर्ण खर्च एकूण कार्यक्रमाच्या २ टक्के निधीतून भागविण्यात यावा.

६. वित्त विभागाच्या दिनांक १८.४.२०१७,दि.३०.६.२०१७,दि.८.८.२०१७ व दि.६.२.२०१८ च्या परिपत्रकातील अटींची पूर्तता करून तसेच वित्त विभागाने सदर परिपत्रकान्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in य संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असुन, त्याचा संकेतांक २०१८०३०६१२५४४१२१०१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.06 14:51:34 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२,

२) मा.मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,

३) मा.राज्य मंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,

४) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा व विधानपरिषद, विधान भवन, मुंबई-३२,

५) सर्व सन्माननीय विधानसभा व विधानपरिषद सदस्य, विधान भवन, मुंबई-३२,

६) प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,

७) कृषि आयुक्त , महाराष्ट्र राज्य, पुणे (५ जादा प्रतीसह),

८) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरीक्षा), मुंबई,

९) महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरीक्षा), नागपूर

१०) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे (५ जादा प्रतीसह),

११) सर्व संचालक / कृषि सहसंचालक, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे,

१२) सर्व जिल्हयांचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,

१३) सर्व जिल्हयांचे जिल्हा कोषागार अधिकारी,

१४) उप सचिव (नियोजन विभाग) , मंत्रालय, मुंबई-३२,

१५) उप सचिव (व्यय-१)/अर्थसंकल्प-१३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,

१६) सहाय्यक संचालक (लेखा-२), कृषि आयुक्तालय, पुणे,

१७) लेखाधिकारी (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, पुणे,

१८) निवड नस्ती (कार्यासन ८-अे).

परिशिष्ट-१

अ.क्र.	जिल्हा	गावांची एकूण संख्या	तालुका	गावाचे नाव
१	२	३	४	५
१	पालघर	१	पालघर	सोनावे / पारगांव
२	रायगड	१	कर्जत	कोळीवडे
३	सिंधुदूर्ग	२	कणकवली	नागसावंतवाडी
			कुडाळ	तुळसुली तर्फ माणगांव
४	**नाशिक**	७	नाशिक	नागलवाडी
			त्र्यंबकेश्वर	सारस्ते
			इगतपूरी	वांजोळे
			येवला	नायगव्हाण
			कळवण	वडाळेवणी
			दिंडोरी	वणी खु.
			सुरगणा	संजयनगर
५	**जळगांव**	१	भडगांव	आचळगांव
६	**अहमदनगर**	१९	नगर	तांदळी वडगाव
			जामखेड	बावी
			राहूरी	कणगर खु.बु.
			राहूरी	वांबोरी
			राहूरी	कातरड
			शेवगाव	थाटे
			संगमनेर	शेडगाव
			संगमनेर	चिंचपूर
			संगमनेर	शिबलापूर
			संगमनेर	खळी
			संगमनेर	पिंप्रीलौकी

			अकोले	वाशेरे
			कोपरगांव	उक्कडगाव
			राहाता	अस्तगाव
			राहाता	केलवड
			राहाता	डोऱ्हाळे
			राहाता	पिंप्री निर्मळ
			राहाता	धनगरवाडी
७	**सोलापूर**	१५	द.सोलापूर	कणबस
			द.सोलापूर	माळकवठे
			द.सोलापूर	मंद्रुप
			द.सोलापूर	होटगी
			मंगळवेढा	लक्ष्मीदहीवडी
			मंगळवेढा	आंधळगांव
			मंगळवेढा	लोणार
			मंगळवेढा	जुनोनी
			सांगोला	ईटकी
			सांगोला	जवळा
			सांगोला	बलवडी
			सांगोला	कडलास
			सांगोला	शिवणे
			सांगोला	चिनके
			करमाळा	खडकी
			कराड	किवळ खोडजाईवाडी
			कोरेगांव	नागझरी
			माण	सोंकसण
			जावळी	महिगाव
			कोरगांव	सोळशी
			वाई	मोहडेकरवाडी

८	**सातारा**	१२	सातारा	शिंदेवाडी
			खटाव	हिंगणे
			खटाव	गुरसाळे
			खटाव	शिरसवडी
			माण	भालवडी
			खटाव	गोरेगांव-वांगी
९	**सांगली**	३	तासगांव	पुणदी
			जत	रावळगुंडवाडी
			पलूस	मोराळे
१०	**कोल्हापूर**	१	पन्हाळा	पिंपळे तर्फ सातवे (बांबरवाडी)
११	**औरंगाबाद**	५	सिल्लोड	नानेगाव जंजाळा
			सिल्लोड	पिंपळदरी
			सिल्लोड	घाटनांद्रा
			सोयगांव	बहुलखेडा
			सोयगांव	घानेगांव
१२	**जालना**	१	जालना	वडगाव
१३	**बीड**	३	आष्टी	जामगाव
			केज	कुंभेफळ
			धारुर	पांगरी (नृसिंह)
१४	**लातूर**	२	लातूर	शिरशी
			देवणी	कोनाली
१५	**उस्मानाबाद**	९	वाशी	तांदुळवाडी
			उस्मानाबाद	पळसप
			उस्मानाबाद	मेडसिंगा
			उस्मानाबाद	टाकळी बे.
			उमरगा	हिप्परगा राव
			तुळजापूर	सलगर मड्डी

			तुळजापूर	कीलज
			तुळजापूर	चिंचोली
			तुळजापूर	सांगवी काटी
१६	**परभणी**	६	गंगाखेड	ईळेगाव
			परभणी	पिंपळगांव टोंग
			पाथरी	डोंगरगाव
			सोनपेठ	सेलगांव हटकर
			पालम	खोरस
			पुर्णा	रेगांव
१७	**नांदेड**	५	उमरी	रामखडक
			कंधार	नंदनवन
			लोहा	धानोरा म.
			हदगांव	ल्याहरी
			हिमायतनगर	किरमगांव
१८	**नागपूर**	१	काटोल	बोरगांव
१९	**भंडारा**	१	मोहाडी	टांगा
२०	**चंद्रपूर**	२	चंद्रपूर	चेकनिंबाळा
			जिवती	नगराळा
२१	**गडचिरोली**	२	वडसा	बोडदा
			कोरची	दवंडी
	एकूण	९९		